Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019 Special Issue- 90 (B)

# महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता



मुख्य संपादक :

डॉ. धनराज धनगर

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | |
|---|---|---|
| 26 | भारतातील मुस्लीम समाजातील दारिद्र्याची स्थिती **डॉ. वैशाली पाटील, शाईन शेख** | 112 |
| 27 | १९९१ नंतर औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल **डॉ. डी. एम. चव्हाण** | 115 |
| 28 | महाराष्ट्रतील सहकार चळवळ **प्रा. सत्यम सानप** | 119 |
| 29 | महाराष्ट्राच्या मानव विकासातील प्रादेशिक असमतोल **प्रा. अमोल पगार** | 122 |
| 30 | महाराष्ट्रातील ग्रामीण विकासात कृषी पर्यटनाची भूमिका **डॉ. क्रांती बोरावके** | 125 |
| 31 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ **डॉ. अशोक ससाणे** | 130 |
| 32 | वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनांचा अभ्यास **डॉ. अनंत राठोड** | 133 |
| 33 | महाराष्ट्रातील समतेसाठी दलित पँथरने केलेला संघर्ष **प्रा. जळबा नरवाडे** | 139 |
| 34 | मध्ययुगीन महाराष्ट्रातील ग्रामरचना : विशेष संदर्भ 'बलुतेदार' **श्री किरण पवार** | 142 |
| 35 | शिवकालीन महाराष्ट्रातील ग्रामजीवन **डॉ. ओमशिवा लिगाडे** | 145 |
| 36 | मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ – एक चिकित्सक अभ्यास **प्रा. प्रेमचंद गायकवाड** | 148 |
| 37 | रं.धों.कर्वेंची शिक्षणासंदर्भात भूमिका – एक चिकित्सक अभ्यास **डॉ. सुभाष बेंजलवार** | 153 |
| 38 | महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समता संघर्ष **प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, डॉ. महादेव गव्हाणे** | 156 |
| 39 | सारंगखेडा यात्रा ऐतिहासिक वारसा -एक अभ्यास **गोरख वाघ** | 160 |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळ **किशोर सूर्यवाड** | 163 |
| 41 | महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांचे योगदान **डॉ. किसान पालके** | 166 |
| 42 | महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळ : एक अभ्यास **प्रा. सहदेव रोडे** | 168 |
| 43 | १८१८ चे सत्तांतर केवळ राजकीय नसून आर्थिक बदलांची सुरुवात : विशेषतः शेतकऱ्यांवरील परिणाम **गणेश भामे** | 173 |
| 44 | ब्राह्मणेतर स्त्री सुधारणा चळवळीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान -एक अभ्यास **प्रा. सहदेव रोडे, डॉ. किसान पालके** | 177 |
| 45 | विदर्भाचे प्रादेशिक मागासलेपण आणि मानवी हक्काचा प्रश्न **डॉ. नंदकिशोर उगले** | 181 |
| 46 | महाराष्ट्रातील उपप्रदेशवाद **डॉ. पंडित नलावडे** | 185 |
| 47 | मराठा समाज : सामाजिक, राजकीय विश्लेषण **डॉ. आर. बी. वनारसे** | 189 |
| 48 | बुलढाणा जिल्ह्यातील शहरीकरणाचा विकासक्रम : भौगोलिक अध्ययन **प्रा. अमोल भुयार, डॉ. विजय खराते** | 196 |
| 49 | महाराष्ट्रातील इमारत व इतर बांधकाम कामगार आणि कामगार चळवळीची गरज : एक अभ्यास **अनिल झेंडे, डॉ.व्ही.ए.पाटील** | 200 |
| 50 | महाराष्ट्रातील प्लास्टिक बंदी व पर्यावरणाचा असमतोल **डॉ. विजय गोरडे, प्रा. रवी रणदिवे, प्रा. पराग मेश्राम** | 206 |
| 51 | महाराष्ट्रातील आर्थिक धोरणानंतरच्या कृषी अर्थसहाय्याच्या स्वरूपाचे विश्लेषण **डॉ. वासुदेव उईके** | 211 |
| 52 | महाराष्ट्रातील ख्रिस्ती मिशनरी चळवळीत स्त्रियांची भूमिका **विश्वास वळवी** | 215 |
| 53 | भूमी उपयोजन कार्यक्षमतेचा भौगोलिक अभ्यास – नंदुरबार जिल्हा **राजेंद्र पवार, विजय खराते** | 220 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 90 (B): महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता
UGC Approved Journal
ISSN : 2348-71..
January-2..

# महाराष्ट्रातील सहकार चळवळ

**डॉ.अशोक नामदेव ससाणे**
अनंतराव पवार कॉलेज पिरंगुट तालुका –मुळशी ,जिल्हा –पुणे
इमेल आयडी :- ashoksasane777@gmail.com
मोबाईल नंबर – ९८८१२४७८२४

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ हे आज महाराष्ट्राचे शक्तिस्थान बनले आहे.महाराष्ट्राच्या कृ.. औद्योगिक अर्थव्यवस्थेचा पाया अधिक मजबूत किंवा भक्कम करण्यात सहकाराचावाटा मोठा आहे. .. राज्यात सहकारालाही यश प्राप्त होण्यामाठी पन्नास वर्षांपेक्षाही जास्त कालावधी लागला.आज महाराष्ट्र .. सहकारी चळवळीबाबत इतर राज्यांपेक्षा देशात अग्रेसर समजले जाते.अर्थात देशाप्रमाणे राज्यातील सहका.. चळवळीने अनेक धक्के सहन केले आहेत.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला चांगले नेतृत्व मिळाल्याने या चळवळीची प्रगती झाली.रा.. महकारने सहकारी चळवळीच्या विकासास हातभार लावला.महाराष्ट्रात १९४९ मध्ये सहकारी सा.. कारखाना अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर (लोणी) येथे सुरु करण्यात आला. त्यानंतर राज्यात सहका.. साखर कारखान्यांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

**महाराष्ट्रात सहकारी चळवळीस सुरुवात :**

भारतात १९०४ साली महकारी संस्था कायदा समंत होऊन महकारी संस्थाना कायदेशीर अस्ति.. देण्यात आले. या कायद्याने महकारी पतपुरवठा संस्थाची स्थापना करता येऊ लागली. १९१२ साली सहका.. संस्था कायद्यात दुरुस्ती करण्यात येऊन अन्य प्रकारच्या सहकारी संस्थाच्या विकास होऊ लागला.१९१८ मा.. चेम्संफर्डने सूचविलेल्या सुधारणांस अनुसरून सहकार हा विषय प्रांतिक सरकारकडे सोपविण्यात आ.. महाराष्ट्र राज्यात सहकारी चळवळीची सुरुवात होण्याच्या दृष्टीने हि एक महत्वाची घटना होती.प्रांति.. सरकारच्या ताब्यात सहकारच्या ताब्यात सहकार हा विषय आल्यानंतर तत्कालीन मुंबई सरकारने १९.. मध्ये सहकारी संस्थासाठीचा कायदा समंत केला.

**सहकारी चळवळीच्या विकासाचे टप्पे :-**

1. पहिला टप्पा – (१९०४ ते १९११)
2. दुसरा टप्पा – (१९१२ ते १९१८)
3. तिसरा टप्पा – ( १९१९ ते १९२९)
4. चौथा टप्पा – (१९२९ ते १९३९)
5. पाचवा टप्पा – (१९३९ ते १९४६)

महाराष्ट्रातील प्रमुख सहकारी **संस्था : ( लाखात )**

| अ.क्र | सहकारी संस्था | २०१६ | | २०१७ | |
|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | सभासद | संस्था | सभासद |
| १ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | ३१ | १.९६ | ३१ | १.९८ |
| २ | प्राथमिक कृषी पतसंस्था | २११०२ | १५९ | २१०८९ | १६८ |
| ३ | महकारी साखर कारखाने | २०२ | २५५५० | १७९ | २६७७ |

ISSN : 2348-7143
January-2019

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | सहकारी दुधसंघ | १४९२१ | ११.६ | ११५९७ | ९.१५ |
| ५ | सहकारी सुत गिरणी | २७८ | ५२०० | २८१ | ३९.९४ |
| ६ | सहकारी हातमाग | ६६५ | ७१२.१४ | ६६४ | ५७९.७ |
| ७ | सहकारी पणन संस्था | ११८३ | १२.१४ | १२०७ | १२८७ |
| ८ | बिगरकृषी सहकारी पतसंस्था | २०८०५ | २३७.०६ | २०४६५ | २२५.५१ |
| ९ | सहकारी गृहनिर्माण वित्तीय संस्था | - | १०४४१ | - | १०३४९ |
| १० | सहकारी ग्राहक भांडार | १२८ | ३.३०५ | १२६ | ३.२५३ |

**संदर्भ : महराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८**

**सहकारी चळवळीतील समस्या :-**

**शासकीय हस्तक्षेप :**

सहकारी चळवळीच्या स्थापनेपासूनच सहकारी संस्थांच्या कार्यात सरकारचा हस्तक्षेप असल्याचे दिसते.सरकारी हस्तक्षेप हा सहकारी संस्थांच्या कार्यपद्धीतील अवश्यक भाग बनला आह.सरकारच्या हस्तक्षेपामुळे सहकारी चळवळीचे स्वातंत्र्य फक्त कागदावरच राहिल्याचे दिसते. त्यामुळे सहकारी चळवळीला खीळ बसत आहे.

**कुशल कर्मचार्यांच्या अभाव :**

प्रशिक्षित कर्मचार्यांची कमतरता हा देखील सहकारी चळवळीतील अडथळा असल्याचे दिसते.बऱ्याचदा राजकीय हस्क्षेपामुळे अकुशल अपात्र कर्मचाऱ्यांची शिफारशीने भरती केली जाते. कर्मचाऱ्यांनां सहकारविषयक कायद्यांचे ज्ञान नसते त्यामुळे सहकारी संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांबद्दलही ते अनभिज्ञ असतात.

**अकार्यक्षम व्यवस्थापन:**

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतील अकार्यक्षम व्यवस्थापन हा एक महत्वाचा भाग कारणीभूत ठरला आहे.कारण या संस्थेच्या सभासदांच्या हिताचा विचार करण्यासाठी व्यवस्थापकिय सुसूत्रता दिसत नाही.त्यामुळे अनेक सहकारी संस्था आपणास फक्त कागदोपत्रीच दिसतात.व्यवस्थापन ही विकामाची गुरुकिल्ली म्हणून समजली जाते महणून व्यवस्थापनयोग्य दिशेने होत नसेल तर प्रगती योग्यदिशेने जात नाही आणि हे देखील सहकारच्या विकासामध्ये खीळ बसण्याचे एक महत्वाची कारणे आहेत

**वाढती थकबाकी :**

चुकीच्या किंवा अयोग्य कर्जवाटपामुळे आणि प्रभावीपणे थकबाकी वसूल न केल्याने आज अनेक सहकारी संस्था विशेषतः कृषी पतसंस्था व बिगर पतसंस्था ,सहकारी बँका,नागरी सहकारी बँका या सहकारी चळवळीसमोर वाढत्या थकबाकीची समस्यानिर्माण झालेली आढळते.

**वाढता तोटा :**

अनेक सहकारी संस्था आज तोट्यात आहे.विशेषतः नागरी सहकारी बंका ,भूविकास बँका, कृषी पतसंस्था तोट्यात असून त्या बंद पडत आहे.त्यामुळे सहकारी चळवळीच्या संख्यात्मक आणि गुणात्मक वाढीवर प्रतिकूल परिणाम होत आहे.

राजकीय नियंत्रण :

सहकारी चळवळ हि सभासदांसाठी त्यांच्या हितासाठी सुरु केलेली आहे.प्रत्यक्षात या चळवळीतून उभ्या राहिलेल्या संस्थांनी कोणती कार्यपद्धती स्वीकारावी कसे कार्य करावे या बाबत सरकार नियामवली तयार करत आहे.

**भ्रष्टाचार :**

आज सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार बोकाळाला आहे, सहकार हे क्षेत्र देखील त्याला अपवाद नाही.संस्थामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची कामचुकार वृत्ती , भ्रष्टाचार यामुळे सहकारी चळवळीला खीळ बसत आहे.


Website – www.researchjourney.net Email - researchjourney2014gmail.com

**महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे भवितव्य :**

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची संख्यात्मक प्रगती लक्षात घेतली तर या चळवळीने खूप यश संपादित केलेले आहे असे वाटते,परंतु अनेक तज्ञांनी सहकारी चळवळीच्या यशापयशाविषयी आपली मते व्यक्त केली आहेत.या चळवळीने गरीब लोकांच्या कल्याणाकडे दुर्लक्ष केले असून श्रीमंत वर्गाच्या हितसंबंधाचे रक्षण केलेले आहेतसेच या चळवळीचा विकासही एकांगी झालेला आहे. डॉ.लोकनाथ यांच्या मते लोकांच्या आशाआकांक्षा पूर्ण करण्यात सहकारी चळवळीस अपयश आलेले आहे,तर डॉ.ग्यानचंदाच्या मते दारिद्र्यात गुंतलेल्या शेतकऱ्यांना,कारागिरांना,छोट्या व्यापाऱ्यांना ,सहकारी चळवळीने कोणतेही मदत केलेली नाही. या सर्व विधानावरून किंवा त्यांच्या मतावरून सहकारीचळवळीत अपेक्षेप्रमाणे यश मिळालेले नाही.

रॉयल कमिशनने असे म्हटले आहे की,ग्रामीण समाज ,आनंदी ,समाधानी ,सुखआणि संपन्न करावयाचा असेल तर सरकारने सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले पाहिजे.भविष्यकाळात सहकारी संस्थासमोरील स्पर्धा अधिक तीव्र होणार आहे. या टिकून राहण्यासाठी सहकारी चळवळीची गुणात्मक वाढ होणे आवश्यक आहे.त्यासाठी ज्ञानी व समाजसेवी नेतृत्वाची सहकारी चळवळीत गरज आहे.या नेतृत्वाने समाजहित समोर ठेऊन काम करणे आवश्यक आहे व सरकारने हि चळवळ वाढवण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.सहकारी चळवळीतील अपप्रवृत्ती दूर करण्याचा प्रयत्न भविष्यकाळात नेटाने आणि कार्यक्षमतेने झाला तर सहकारी चळवळीला उत्तमप्रकारे भवितव्य असेल यात शंका नाही

**सहकारी चळवळीचे भवितव्य पुढीलप्रमाणे स्पष्ट करत येईल.**

राजकीय हस्तक्षेप कमी करणे
कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे
कर्जवाटप नियमित करणे
सहकारी संस्थाचे सक्षमीकरण करणे
गुणवत्तावाढीस प्राधान्य देणे
तोट्यात चाललेल्या संस्था बंद करणे

**सारांश :**

सहकार चळवळीत महाराष्ट्रराज्य अग्रेसर आहे.महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकार चळवळ महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे.सहकारी चळवळीमुळे आर्थिक क्षेत्राचा विकास झालेला आहे.इतर राज्याच्या तुलनेत सहकारी चळवळीबाबत महाराष्ट्र अग्रेसर आहे.महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकाराने मोठे योगदान दिले आहेत परंतु सहकारी चळवळीसमोर अनेक समस्या आहेत.त्या कमीझाल्या तर सहकारी चळवळीचा विकास होण्यास मदत होईल.आर्थिक व नैसर्गिक कारणामुळे असमतोल निर्माण झालेला आहे. तो कमी करण्याची गरज आहे

**संदर्भ :**

1. महाराष्ट्रातील आर्थिक पाहणी २०१७-१८
2. रूपाभाटा, डी.एच.दामजी,'सहकार' फडके प्रकाशन कोल्हापूर
3. पुष्पा तायडे ,संशोधन पद्धती , विद्याप्रकाशन, नागपूर
4. राजेंद्र रसाळ ,'भारतीय अर्थव्यवस्था' स्केसस प्रकाशन, पुणे
5. कोपर्डीकर ,जोशी 'सहकार परिचय'
6. दृष्टीक्षेपात महाराष्ट्र २०१६-१७